महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# <u>निम्नस्तर लिपीक(लेखा) या पदाच्या ऑनलाईन परिक्षेबाबत सुचना</u>

---------

महापारेषण कंपनीने दि. ०२.०३.२०१६ रोजी निम्नस्तर लिपीक (लेखा) पदांसाठी सरळसेवा भरतीच्या जाहिराती परिमंडल कार्यालयांनी जाहिरात क्र. ०१/२०१६ तसेच मुख्य कार्यालय, मुंबई यांनी जाहिरात क्र. ०३/२०१६ अन्वये प्रसारित केल्या होत्या.

२. त्या अनुषंगाने ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या सादर केलेल्या सर्व उमेदवारांची ***<u>ऑनलाईन लेखी परिक्षा ही दि. ०३.०६.२०१६ रोजी आयोजित करण्यात आली आहे</u>***.

३. **ऑनलाईन परिक्षा पत्र (Call Letter)** व माहिती पुस्तिका (Information Handout) या बाबत **दि. २१.०५.२०१६ रोजी स्वतंत्र सुचनापत्र (Notification)** जारी करण्यात येईल. सदर सुचनापत्र (Notification) मध्ये उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा पत्र (Call Letter) व माहिती पुस्तिका (Information Handout) याची प्रत Download करण्याकरीता लिंक (Link) उपलब्ध देण्यात येईल.

**(अ) लेखी परिक्षेचे स्वरुपः-**

| अनु.क्र. | चाचणी | प्रश्न | गुण | परिक्षा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | विषयाचे ज्ञान (Professional Knowledge) | ५० | ११० | एकत्रित कालावधी १२० मिनीट |
| २. | सामान्य अभियोग्यता (General Aptitude)<br>अ) तर्कशक्ती (Reasoning)<br>ब) संख्यात्मक अभियोग्यता (Quantitative Aptitude)<br>क) मराठी भाषा (Marathi Language) | <br>४०<br>२०<br>२० | <br>२०<br>१०<br>१० | |
| | एकुण (१+२) | १३० | १५० | |

**टिपः-** ऑनलाईन लेखी परिक्षेत वस्तूनिष्ठ स्वरुपाचे (Objective Type) प्रश्न असतील

४. ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या सादर केलेल्या सर्व उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेस बोलविण्यात येत आहे. ऑनलाईन लेखी परिक्षेस उमेदवारांना बोलविण्यापुर्वी त्यांच्या पात्रतेची म्हणजेच वय, शैक्षणिक अर्हता इ. बाबतची पडताळणी करण्यात आलेली नाही. सबब, उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेकरीता हजर होण्यापुर्वी जाहिरातीत नमूद केलेल्या विहित शैक्षणिक अर्हता, वय, प्रमाणपत्रे इत्यादी बाबी धारण करत असल्याची खात्री करावी.

**ऑनलाईन परिक्षेस हजर राहण्याबाबतच्या सुचनाः-**

५. ऑनलाईन परीक्षेस हजर होताना उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१) लेखी परिक्षेस उपस्थित राहण्याबाबत महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध call letter.

२) खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रांपैकी कोणत्याही एका ओळखपत्राची **मूळ (Original)** व एक फोटोकॉपी सादर करावी. **ओळखपत्राची मूळ प्रत आवश्यक राहील रंगीत प्रत Colour Copy ग्राह्य धरली जाणार नाही.**

*"पॅन कार्ड (PAN Card) / पासपोर्ट (Passport) /वाहन परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter"s Card) / अलीकडचे छायाचित्र असलेले बँकेचे पासबूक (Bank Passbook with photograph) / राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / लोकप्रतिनिधिने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / मान्यताप्राप्त महाविद्यालय / विद्यापिठाकडील अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र (valid recent Identity Card issued by a recognized college / university) / छायाचित्र असलेले आधार कार्ड (Aadhar card with a photograph) / कर्मचारी ओळखपत्र (Employee ID) / अलीकडचे छायाचित्र असलेले बार काऊनसीलचे ओळखपत्र (Bar Council Identity card with photograph)"*

**३) महिला उमेदवारांसाठी:-**

महिला उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव व छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव हे एकसमान असणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव हे छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव पेक्षा वेगळे असेल अशा महिला उमेदवारांना परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

४) ऑनलाईन परिक्षेसाठी विहीत केलेल्या वेळेनंतर कोणत्याही कारणास्तव उशिराने हजर होणाऱ्या उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

५) परिक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबंधीच्या विविध औपचारिकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्जदाराने परीक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेल्या वेळेच्या आधीच परिक्षाकेंद्रावर हजर राहणे अपेक्षीत आहे.

**6) ओळखपत्र तपासणी:-**

परिक्षा केद्रांवर /परिक्षा सभागृहात उमेदवारांच्या परीक्षा पत्राची (Call letter), मूळ छायाचित्र ओळखपत्राची तपासणी करण्यात येईल. उमेदवार स्वतःची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास अशा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

६. उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेस स्वतःच्या जोखीमवर उपस्थित रहावे. महापारेषण कंपनी कोणत्याही प्रकारच्या दुखापतीस अथवा हानीस जबाबदार राहणार नाही.

**दि. १६.०५.२०१६**

******